फेब्रुवारी - २०२४ * अंक- ८ वा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2023-24





आर.आय.प्रेसिडेंट
रो. गॉर्डन आर. मॅकइनली



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
रो. आशा वेणुगोपाल



प्रेसिडेंट
रो. मनोज जोशी



ऑन.सेक्रेटरी
रो. ॲड. हेमंत भंगाळे



बुले.कमिटी चेअरमन
रो. स्वाती ढाके

CREATE HOPE in the WORLD

### संपादकीय....

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

सर्वप्रथम आपल्या सर्व रोटरी परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन ! ६ फेब्रुवारी रोजी आपल्या क्लबचा **चार्टड डे** आहे. आपला क्लब ७५ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. यासाठी मेहनत घेतलेल्या सर्व रोटेरीयन्स चे मन:पूर्वक आभार. यासाठी क्लब मध्ये जोरदार तयारीही चालू आहे आणि २३ फेब्रुवारी १९०५ रोजी शिकागो येथे रोटरी ची पहिली मीटिंग झाली. त्याला आज ११९ वर्षे पूर्ण होत आहे.

मागील महिन्यात सर्वांनी नाशिकच्या पवित्र वातावरणात डिस्टिक्ट कॉन्फरन्स चा आनंद घेतला. गौरांग प्रभू असो की अनुपम खेर, तसेच तरुण बिझनेस मॅन सोमानी व पल्लवी उतागी सर्वांनीच प्रेक्षकांची मने जिंकली. खरं तर मला कौतुक वाटते ते भक्ती शर्मा यांचे अमेरिकेतील आरामातील जीवन सोडून बरखेली अब्दुल्ला गावात येऊन त्यांनी गावाचा सर्वांगीण विकास केला. भारताला तरुण म्हटले जाते, कारण आपल्या लोकसंख्येत तरुण मंडळांची संख्या जास्त आहे. आपल्या देशातील तरुणांनी त्यांच्यापासून शिकायला हवे. देशाची प्रगती ही खेड्या गावांमध्ये आहे. निरोगी आयुष्य, शांत जीवन हे आपल्याला तिथेच मिळेल. यावर्षीच्या कॉन्फरन्स मधून हेच शिकायला मिळाले की, स्वतःचा विकास करून माणूस सुखी समाधानी होतो. मग तो विकास अध्यात्मिक असो, अंतरिक असो, सामाजिक असो किंवा प्रापंचिक.

फेब्रुवारी हा 'शांतता आणि संघर्ष प्रतिबंधक/ निवारक 'म्हणून डेसिग्नेटेड मंथ आहे. यावर माहितीपूर्ण लेख आपण पान नंबर सहावर दिलेला आहे. शांततेने आपली सर्वांगीण प्रगती होते .भांडण तंटे मिटतात. आज जगात जे युद्ध सदृश्य स्थिती आहे किंवा काही देशात युद्ध सुरू आहे. तेथेही रोटरी शांततेचे काम करत आहे .कारण यात वित्त व जीवित हानी खूप होत आहे. शांततेनेच या प्रश्नांवर चर्चा करून उपाय मिळतील, नाहीतर विनाश अटल आहेच. हे जाणूनच रोटरी तर्फे फेब्रुवारी महिनाभर जगभरात शांततेसाठी विविध प्रोजेक्ट आयोजित केले जातात.

**- रो. स्वाती ढाके**

### रोटरी जागतिक शांती सभासदत्व

१९९९ साली रोटरी स्थापनेने जगातल्या सात विश्वविद्यालयाच्या भागीदारीत शांती व संघर्षाच्या निकारणाच्या आंतरराष्ट्रीय अभ्यासाकरिता रोटरी केंद्र सुरू केली. याची मदत विविध देशांच्या व संस्कृतीच्या जागतिक सभासदांना पुढारी शैक्षणिक संधी पुरविण्यात होते. दरवर्षी ६० सभासदांची संघर्ष निवारण ,शांती पठण आणि आंतरराष्ट्रीय नाती या विषयांची दोन वर्षाच्या प्राविण्यस्तराच्या पदवी व सर्टिफिकेट कार्यक्रमाकरिता निवड केली जाते. स्तराच्या जागतिक स्पर्धात्मक चयन प्रक्रिये करिता प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी एक उमेदवार निवडू शकतो. प्रथम रोटरी जागतिक सभासदांनी आपले शिक्षण २००२ ते ३ साली सुरू केले. रोटरी केंद्र भविष्यात संघर्षाचे मूळ कारक, आंतरराष्ट्रीय संबंधांच्या सिद्धांतात आणि सहकार्याची परिणामकारक स्वरूपाचे अभ्यास करण्यास भावी नेत्यांना संधी प्रदान करतील. अभ्यासाव्यतिरिक्त रोटरी सभासदांना त्यांनी निवडलेल्या देशात संघर्ष करावयास प्रामाणिक हत्यार मिळतील. संघर्ष निराकरण आणि जागतिक समन्वय संबंधित शोध शिक्षण प्रकाशन काढण्यास देखील रोटरी केंद्र मदत करतील.

रोटरी जागतीक सभासदांच्या पहिल्या वर्गातील २०४ साली पदवी घेतली आणि ते जागतिक समाजात आपले महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकले. संयुक्त राष्ट्र संघ परराष्ट्रीय नीती तज्ञ ,परदेशी सेवा अधिकारी, अर्थशास्त्री आणि नीती विश्लेषक म्हणून कार्य करत आहेत

# जानेवारी महिन्यातील साप्ताहिक सभा

**✻ ५ जानेवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही बिझनेस मिटींग होती.






**✻ १२ जानेवारी–** रोजी आयोजित सभेचा विषय ‘इम्प्रेशन ऑफ कॉन्फरन्स्’ होता. या वेळेस कॉन्फरन्सला उपस्थित असलेले रो.सुबोध सराफ, रो.विजय जोशी, रो.किशोर जाखेटिया, रो.सौ.स्वाती ढाके, रो.तेजस पवार, रो.डॉ.जयंत जहागीरदार, रो.ॲड.सागर चित्रे, रो.पी.पी.डॉ.तुषार फिरके, रो.उदय पोतदार, पी.पी.रो. प्रेम कोगटा यांनी त्यांचे अनुभव शेअर केले.

**✻ १९ जानेवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता. ‘गाथा माझ्या यशाची’ आपल्या रोटरी परिवारातील सदस्य रो.पी.पी.प्रेम कोगटा, रो.पी.पी.पी.राघवेंद्र काबरा, रो.किशोर तलरेजा, रो.विष्णुकांत मणियार हे स्पिकर म्हणून या कार्यक्रमास लाभले होते.




**✻ २६ जानेवारी –** रोजी प्रजासत्ताक दिना निमित्त राष्ट्रीय सुट्टी असल्यामुळे साप्ताहिक मिटींग घेण्यात आली नाही.

# जानेवारी महिन्यातील प्रोजेक्टस्




*** ३ जानेवारी –** रोजी जि.प. मराठी शाळा कंडारी, ता.जि.जळगाव येथील शालेय विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी रेडक्रॉस सोसायटीच्या मदतीने रोटरी क्लब जळगाव तर्फे करण्यात आली. यावेळी अध्यक्ष मनोज जोशी, मेडीकल कमिटी चेअरमन पी.पी.रो.डॉ.तुषार फिरके, पी.पी.रो.जितेंद्र ढाके, तसेच शाळेचे मुख्याध्यापक व इतर शिक्षकवृंद उपस्थित होते.

*** १३, २०, २७ व ३१ जानेवारी –** रोजी रो.डॉ.पी.पी. तुषार फिरके यांच्या विष्णुलिला हॉस्पीटल येथे मालधक्का वरील कामगार व त्यांच्या परिवारातील सदस्यांचे ८ मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच २० तारखेला धानोरा येथील ६ ग्रामस्थांचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच २७ तारखेला १० ग्रामस्थांचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच ७ तारखेला १० ग्रामस्थांचे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. यावेळी अध्यक्ष मनोज जोशी, मा.सचिव ॲड.हेमंत भंगाळे, पी.पी.डॉ.तुषार फिरके, डॉ.काजल फिरके, पी.पी.जितेंद्र ढाके, रो.सौ.स्वाती ढाके, पी.पी.संदीप शर्मा, रो.मकरंद डबीर, रो.रितेश जैन उपस्थित होते. सौ.विनया जोशी, रो.पराग अग्रवाल उपस्थित होते.




# रोटरी डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स २०२३-२४ 'आशायें'










# टेक्नो मंत्र विज्ञान प्रदर्शन

रोटरी क्लब जळगावच्या माध्यमातून समाजातील विद्यार्थ्यांना ते घेत असलेल्या शिक्षणाव्यतिरिक्त त्यांचा विविधांगांनी समृद्ध विकास व्हावा यासाठी अनेकविध उपक्रम घेतले जात असतात. असल्या उपक्रमांच्या माध्यमातून विध्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळावा, अष्टैलुत्व यावे यासाठी आमचा नेहमीच प्रयत्न राहिलाय. यावेळीसुद्धा एका आगळ्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळावी आणि मुलांमध्ये विज्ञान विषयाची गोडी व वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासोबत आपली सृजनशीलता दाखवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आपल्या इंटरॅक्ट क्लब अंतर्गत जोडलेल्या शाळांत स्पर्धात्मक पद्धतीने 'विज्ञान प्रदर्शनाचे' आयोजन दि.१९ जानेवारी रोजी केले गेले. सदर प्रदर्शनासाठी आपल्या इंटरॅक्ट क्लबच्या सगळ्याच शाळांनी अतिशय उत्स्फूर्तपणे आपला सहभाग दर्शवत सदर विज्ञान प्रदर्शनासाठी एकुण ९ शाळांतील १०२ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवत ७१ प्रकल्प प्रदर्शनासाठी स्पर्धेत ठेवले होते. सगळेच प्रकल्प अतिशय नेटक्या स्वरूपात मांडलेले होते आणि विद्यार्थी उत्स्फूर्तपणे आपण मांडलेल्या प्रकल्पांची माहिती आत्मविश्वासाने देत होते.

स्पर्धेत एकुण १२ बक्षिसे देण्यात आली. यात, प्रथम क्रमांक, फायर कंट्रोल युनिट– या.दे.पाटील विद्यालय– रू. २०००, द्वितीय क्रमांक– पॉवर जनरेटर– ए.टी.झांबरे विद्यालय– रू. १,५००, तृतीय क्रमांक – रिव्हर क्लिनिंग नोट– नंदिनीबाई विद्यालय – रू. १०००.

उत्तेजनार्थ :– १) आटोमेटिक हँन्ड वॉश– नंदिनीबाई विद्यालय, २) स्मोक मशीन– या.दे.पाटील विद्यालय, ३) हेमोडायलिसिस– ए.टी.झांबरे विद्यालय, ४) ट्रि प्लांटेशन युनिट – का.ऊ. कोल्हे विद्यालय, ५) पोकलॅन्ड मशीन – का.ऊ. कोल्हे विद्यालय, ६) रोड ॲक्सिडेंन्ट मॉडेल– या.दे. पाटील विद्यालय, ७) फुफ्फुसं– ए.टी.झांबरे विद्यालय, ८) ट्रॉफीक अलर्ट– ए.टी.झांबरे विद्यालय, ९) ह्युमन बॉडी सिस्टीम – या.दे. पाटील विद्यालय – रू. २०० व प्रमाणपत्र देवून आदी प्रकल्पांकरिता विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. सदर विज्ञान प्रदर्शनाकरता शाळांतर्फे, पी बी डाके सर, श्रीमती अहिरराव मॅडम, संजय पाटील सर, चेतना राणे मॅडम, शीतल कोल्हे मॅडम, संजय पाटील सर, अर्चना चौधरी मॅडम, विद्या कुरकुरे मॅडम, मनीषा बारी मॅडम, सुधाकर गायकवाड सर, तुकाराम माळी सर आणि संजय बडगुजर सर आर्दीचे सहकार्य झाले. विज्ञान प्रदर्शनाचा कार्यक्रम यशस्वी होण्याकरता रो. योगेश गांधी, रो. राघवेंद्र काबरा सर, रो.तुषार फिरके सर, रो.काजल फिरके मॅडम, रो.हेमिन काळे सर, रो.पराग अग्रवाल सर, रो.जितेंद्र ढाके सर, रो.स्वाती ढाके मॅडम आदिंचे बहुमोल सहकार्य झाले .





# धानोरा मेडीकल कॅम्प

रोटरी क्लब जळगावच्यावतीने धानोरा येथील झि. तो. महाजन माध्यमिक विद्यालय व ना. भा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये नु, गिरडगाव, मोहरद, डांभुर्णी, अडावद परिसरातील ६३० रुग्णांनी लाभ घेतला तर त्यांच्या १२०० हुन अधिक विविध तपासण्या करण्यात आल्या. यात डोळे, दात, हाडे, बीपी, शुगर, त्वचा रोग, स्त्रिया व बालकांच्या तपासणीचा समावेश आहे. जवळपास ५३० हुन अधिक नागरिकांनी डोळे तपासणीचा लाभ घेतला त्यातील २४० रुग्णांना लगेच विनामूल्य चष्मे देण्यात आले तर ८० रुग्णांच्या लवकरच जळगाव येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. सुमारे ५८० रुग्णांना विनामूल्य औषधी वितरित करण्यात आली आहे. रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष मनोज जोशी, मानद सचिव ॲड. हेमंत भंगाळे, मेडिकल कमिटी चेअरमन डॉ. तुषार फिरके यांनी ग्रामस्थांचे धन्यवाद व्यक्त केले. सकाळी ९ वाजता सुरु झालेल्या या आरोग्य तपासणी शिबिरात रोटरीचे माजी प्रांतपाल बालरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर सिकची, जनरल तपासणीसाठी डॉ. सुनील सूर्यवंशी, डॉ. पराग जहागिरदार, डोळ्यांच्या तपासणीसाठी डॉ. तुषार फिरके, डॉ. हेमंत बाविस्कर, दातांच्या तपासणीसाठी डॉ. पवन बजाज, स्त्रियांच्या तपासणीसाठी डॉ. सुमन लोढा व डॉ. साधना पाटील, हाडांच्या व सांध्यांच्या तपासणीसाठी डॉ. ज्ञानेश पाटील, डॉ . निवेदिता प्रसाद , डॉ .मयंक चौबे ,आर्दीनी सहभाग

पान नंबर ५ वर

घेतला. त्यांना वैद्य जयंत जहागिरदार, डॉ. काजल फिरके, डॉ. महेश पाटील आदींनी सहकार्य केले. नोंदणी व रुग्णांची व्यवस्था ॲड. हेमंत भंगाळे, संदीप गुजर, वासुदेव महाजन, पराग अग्रवाल, चंदन महाजन, रितेश जैन, योगेश चौधरी, विश्वजित बऱ्हाटे, पंकज जयस्वाल, आकाश डोकनिया, शाम अग्रवाल यांनी पाहिली. औषधी वाटपाची व्यवस्था विजय जोशी, जय जोशी व चंद्रकांत सुर्वे, अमोल मोरे ,हर्षल पवार, नितीन कुलकर्णी यांनी केली. इतर व्यवस्था रो. जितेंद्र ढाके, रो. ॲड. सागर चित्रे, रो. प्रदीप खिवसरा, रो. तेजस पवार,सौ. विनया जोशी, डॉ. शुभदा कुळकर्णी, डॉ. प्रज्ञा जंगले यांनी पहिली. याप्रसंगी झि.तो.महाजन माध्यमिक विद्यालयाचे चेअरमन प्रदीप महाजन, ज्येष्ठ संचालक बी.एस. महाजन, वामनराव महाजन, योगेश पाटील, बाजीराव पाटील, जगदीशकुमार पाटील, सागर चौधरी, एस.पी. महाजन, डॉ. मन्साराम महाजन, माणिकचंद महाजन, अशोक महाजन आदी उपस्थित होते. कुलदीप महाजन, राजेंद्र पाटील, संतोष कोळी, उमाकांत पाटील आदींनी सहकार्य केले. रो.गिरीश कुलकर्णी यांचे या प्रोजेक्टसाठी विशेष सहकार्य लाभले.





## करिअर मार्गदर्शन कॅम्प

जीवनात कोणत्याही क्षेत्रात कार्य करीत असताना चांगला माणूस बनणे हे करिअरचे अंतिम ध्येय असले पाहिजे असे प्रतिपादन गिरीश कुळकर्णी यांनी केले. रोटरी क्लब जळगावच्या करियर प्रकल्पाच्या समारोपाच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष मनोज जोशी, मानद सचिव ॲड. हेमंत भंगाळे, लिटरसी कमिटी चेअरमन डॉ. शुभदा कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख पंकज व्यवहारे उपस्थित होते. आपल्या मनोगतात गिरीश कुलकर्णी पुढे म्हणाले की, आपल्याला ओळख, प्रतिष्ठा, पैसा, समाधान व आनंद ज्या क्षेत्रातून मिळतं त्याला सर्वसाधारणपणे करिअर असे म्हणतात. दुर्दम्य इच्छाशक्ती, सुयोग्य माहिती, निश्चित असे ध्येय व प्रामाणिकपणे केलेली मेहनत यामुळे आपण आपल्या करियर क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो. शालेय जीवनातील विविध स्पर्धा व उपक्रमांमधील सहभागामुळे आपल्याला आपली ओळख होते. आपली आवड, क्षमता यांची कल्पना येते व त्यावर आधारित करिअर निवडल्यास यशस्वी होण्याची शक्यता वाढते. डॉ. शुभदा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व आभार मानले. जळगाव शहरातील ११ शाळांमधील ५५ गरजू विद्यार्थ्यांना रोटरी क्लब जळगावच्या माध्यमातून गिरीश कुलकर्णी, पंकज व्यवहारे, वृषाली व्यवहारे व विजय सोनवणे यांनी करिअर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा. पुनम मानधने, डॉ. जयंत जहागिरदार, डॉ. तुषार फिरके, डॉ. काजल फिरके, उदय पोतदार, योगेश गांधी, रितेश जैन यांचेसह विविध शाळांमधील शिक्षक विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# शांतता आणि संघर्ष प्रतिबंध

**माजी अध्यक्ष रो. डॉ. तुषार फिरके**



शांतता आणि संघर्ष प्रतिबंध/निराकरणमहिना रोटरी शांतता आणि संघर्ष प्रतिबंध/निराकरण कॅलेंडरमध्ये फेब्रुवारी महिना विशेष आहे कारण त्याला जागतिक समज महिना म्हणून नियुक्त केले आहे. या महिन्यात २३ फेब्रुवारी १९०५ रोजी रोटरी इंटरनॅशनलच्या स्थापनेच्या वर्धापन दिनाचाही समावेश आहे, ज्याला आता जागतिक समज आणि शांतता दिवस म्हणून ओळखले जाते. जागतिक समज  महिना ठरवताना, रोटरी इंटरनॅशनल बोर्ड सर्व रोटरी क्लबना त्यांच्या साप्ताहिक बैठकांसाठी कार्यक्रम आखण्यास सांगतो आणि 'जागतिक शांततेसाठी आवश्यक समज आणि सद्भावना' यावर जोर देण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यास सांगतो. या नियुक्त महिन्याचे निरीक्षण करण्यासाठी, अनेक क्लब आंतरराष्ट्रीय स्पीकर्सची व्यवस्था करतात, शाळा आणि विद्यापीठांमधील युवा विनिमय विद्यार्थ्यांना आणि आंतरराष्ट्रीय विद्वानांना क्लब मीटिंगमध्ये आमंत्रीत करतात, माजी ग्रुप स्टडी एक्सचेंज टीम सदस्य असलेल्या कार्यक्रमांची योजना आखतात, जागतिक समस्यांवर चर्चा आयोजित करतात, आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक किंवा उपस्थित मनोरंजनासह. कलात्मक थीम, आणि आंतरराष्ट्रीय जोर देऊन इतर कार्यक्रम शेड्यूल करा. आम्ही बर्टन क्लबचे डॉ. ब्रॅड हॅबरमेहल यांच्या नेतृत्वाखाली मेक्सिकोमध्ये प्रतिबंध करण्यायोग्य अंधत्व कार्यक्रमात आमच्या प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करत आहोत, ते ११ फेब्रुवारी रोजी बोलतील. आमचे स्वतःचे रिचर्ड मॉर्ले बॅरन, जिल्हा जागतिक शांतता फेलोशिप चेअर, २५ फेब्रुवारी रोजी बोलतील. वर्ल्ड अंडरस्टॅंडिंग मंथ ही आमच्या क्लबसाठी आणि प्रत्येक रोटेरियनसाठी सेवांच्या चौथ्या मार्गाला विराम देण्याची, योजना आखण्याची आणि प्रोत्साहन देण्याची संधी आहे – रोटरीचा जगातील लोकांमध्ये सद्भावना, शांतता आणि समजूतदारपणाचा सतत प्रयत्न. रोटरीच्या कॅलेंडरमध्ये फेब्रुवारी महिना खूप खास आहे कारण त्यात २३ फेब्रुवारी १९०५ रोजी शिकागो येथे झालेल्या रोटरीच्या पहिल्या सभेच्या वर्धापन दिनाचा समावेश आहे. तो दिवस आता 'जागतिक समज आणि शांतता दिवस' म्हणून ओळखला जातो. २३ फेब्रुवारी रोजी रोटरी पहिल्या रोटरी क्लबच्या बैठकीचा ११९ वा वर्धापन दिन साजरा करत आहे. रोटरी क्लब आणि जिल्ह्यांसाठी रोटरीची सार्वजनिक प्रतिमा वाढवण्याची ही संधी आहे. रोटरी मीडिया सेंटरमध्ये विविध साधने उपलब्ध आहेत: रोटरी डे साजरा करण्यासाठी येथे ८ कल्पना आहेत: रोटरी हिस्ट्री स्पीकर ब्यूरो तयार करा. समाजातील रोटरी क्लब सदस्यांना लायब्ररी, चेंबर ऑफ कॉमर्स आणि शाळांमध्ये रोटरीच्या सेवेच्या शतकातील प्रकल्प उदाहरणे वापरून स्वयंसेवीतेच्या मूल्यावर बोलण्यास सांगा. १. तुमच्या रोटरी क्लबच्या सदस्यांना १६ ते २२ फेब्रुवारी या आठवड्यात एकूण १०९ तास स्वयंसेवक सेवेसाठी वचनबद्ध करा. २३फेब्रुवारी रोजी एकूण घोषणा करा. २.रोटरीने भूतकाळात स्थानिक आणि जागतिक स्तरावर काय साध्य केले आहे आणि ते आजही का प्रासंगिक आहे हे अधोरेखित करण्यासाठी संपादकाला वर्तमानपत्रातील लेख किंवा पत्र लिहा. ते समुदाय किंवा शालेय वर्तमानपत्रांमध्ये ठेवा. रोटरी डे न्यूज रिलीझसाठी टेम्पलेट येथे उपलब्ध आहे: रोटरी डे प्रेस रिलीज टेम्पलेट  स्थानिक माध्यमांसाठी अद्यतनित आणि वैयक्तिकृत केले जावे. ३. तुमच्या समुदायाच्या महापौरांना तुमच्या गावात २३ फेब्रुवारीला 'रोटरी डे' घोषित करण्याची विनंती करा. एक नमुना घोषणा येथे उपलब्ध आहे:  हे देखील २०२२ साठी आणि तुमच्या समुदायासाठी अपडेट करणे आवश्यक आहे. तुमच्या समाजातील रोटरीच्या इतिहासावर एक लेख लिहा. व्यावसायिक, समुदाय, युवक आणि आंतरराष्ट्रीय सेवेवर लक्ष केंद्रित करा. संभाव्य प्रकाशनासाठी ते तुमच्या स्थानिक वृत्तपत्रात सबमिट करा. रोटरी डे च्या सन्मानार्थ मॉर्निंग टॉक शो किंवा संध्याकाळच्या बातम्यांच्या सेगमेंटमध्ये रोटेरियन दिसण्यासाठी स्थानिक टेलिव्हिजन स्टेशन किंवा रेडिओ स्टेशनशी समन्वय साधा. ते रोटरी इतिहास आणि स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय सेवा प्रयत्नांवर प्रकाश टाकू शकतात. गरज असलेल्यांना वितरणासाठी वस्तू गोळा करा, जसे की शूज, शालेय साहित्य, कोट, हातमोजे आणि चष्मा, आणि रोटरी डे कार्यक्रमादरम्यान त्यांचे वितरण करा. ४.रोटरीचा  वाढदिवस  साजरा  करण्यासाठी  रोटरी  गिअरव्हीलच्या आकारात एक विशाल वाढदिवस केक तयार करा आणि तो शेअर करण्यासाठी समुदाय किंवा मीडियाला आमंत्रित करा. २३ फेब्रुवारी रोजी रोटरी डे साजरा करण्यासाठी आणि आपल्या समुदायामध्ये रोटरी आणि आपल्या क्लबचा प्रचार करण्यासाठी या फक्त ८ कल्पना आहेत. वर्धापनदिन ही रोटरीची कथा सांगण्याची आणि जगात चांगले काम करण्याच्या आपल्या दृष्टीमध्ये इतरांना गुंतवून ठेवण्याची एक उत्तम संधी आहे. रोटरीने या विशेष प्रसंगांवर आधारित मीटिंग अजेंडा, प्रकल्प किंवा सार्वजनिक प्रतिमा मोहिमा विकसित करण्यासाठी क्लबना मदत करण्यासाठी महिने नियुक्त केले आहेत. रोटरी कॅलेंडर म्हणजेच रोटरी नियुक्त महिन्यांवर आधारितसंकल्पना ही आहे की जिल्ह्यातील सर्व क्लबना वर्षभरात कोणत्या प्रकारच्या सेवा प्रकल्पांचा समावेश करता येईल, याचा रेडी रेकनर देणे आणि वर्षभरातील क्रियाकलापांची आखणी करण्यात मदत करणे

# रोटेरियन असल्याचा अभिमान

रो. स्वाती ढाके



रोटरी प्रणाम !

मला रोटेरियन असल्याचा अभिमान आहे आणि तेही आपल्यासारख्या जुन्या ,अनुभवी आणि उज्वल परंपरा लाभलेल्या क्लब ची सदस्य असल्याचा. पूर्ण डि.३०३० मध्ये आपल्या क्लब बद्दल आदर, दबदबा, मान आहे .त्यामुळे कुठेही गेले की रोटरी क्लब जळगावची मेंबर सांगायला अभिमान वाटतो .समोरचा पटकन आपल्या सीनियर रोटरीयन ची ओळख देतो. तेव्हा तर खूपच आनंद होतो. माझे आतापर्यंतचे जीवन म्हणजे माझे घर आणि मी .अभ्यासू वृत्ती मुळे दरवर्षी मी नवीन कोर्स किंवा नवीन गोष्टी शिकत होते .पण ते सर्व प्रत्यक्ष इम्प्लिमेंट करायला मिळाले, ते रोटरीच्या माध्यमातून. २००९ –१० यावर्षी जेव्हा जितेंद्रजी रोटरी चे सदस्य झाले .तेव्हापासूनच मी रोटरी परिवारात सामील झाले. २०१९–२० यावर्षी रो.कॅप्टन कुलकर्णी हे अध्यक्ष असताना मी ऑफिशिअली रोटरी परिवाराची सदस्य झाले २०१७– १८ यावर्षी क्लबचे अध्यक्ष डॉ. तुषार फिरके यांनी मला लेडीज कमिटी चेअरमन केले. यावर्षीपासूनच माझी कमिटी चेअरमन म्हणून रोटरी कार्याला सुरुवात झाली. याच वर्षी स्व. रो. जंगले दादांनी मला ७×७×७ कमिटीत घेतले. त्यामुळे मला विविध शाळांमध्ये जाऊन मुलांची गप्पा मारता आल्या. आठ वर्ष झाले मी या मुलांची जोडली गेली आहे. ब–याच शाळेत गेले की, तेथील शिक्षक माझी ओळख करून देतात ' मॅडम आपल्याच शाळेच्या परिवारातील सदस्य आहेत', 'एखादा विद्यार्थी माझ्या भाषणाची हुबेहूब कॉपी करतो' किंवा एखादी विद्यार्थिनी 'मॅडम मला फोन करत जा ', 'मला तुमचा पत्ता द्या मी नक्की भेटायला येईल' तेव्हा रोटरी क्लबच्या कार्याबद्दल खूप कृतार्थ वाटते .जेव्हा सिनिअर रोटेरीयन्स माझ्या कामाची कौतुक करता ,तेव्हा जगातील सर्वात मोठा अवॉर्ड मिळाल्याचा आनंद होतो. विशेष म्हणजे रो. डॉ. शुभदा मॅडम चे प्रेमाने रागावणे असो की कौतुक करणे, माझ्यासाठी तर खूपच अमूल्य आहे .मी पॉल हॅरीस फेलो आहे. माझी दोन्ही मुलंही पॉल हॅरीस फेलो झाले . दरवर्षी आपल्या प्रोजेक्टमध्ये ते सहभाग घेतात .समाजाचा आपण काही देणं लागतो व आपल्या परीने आपण ते ऋण फेडले पाहिजे ,ही भावना मी आपल्या क्लबच्या माध्यमातून त्यांच्यात रुजवू शकले. त्यांच्याच नाही तर त्यांचे मित्र– मैत्रिणींच्या, नातेवाईकांमध्ये रोटरी कार्याबद्दल भावना जागृत करू शकले. याचे मला समाधान वाटते. जळगाव सारख्या छोट्या शहरात राहूनही आपण उच्च प्रतीचे वैचारिक, साहित्यिक, सामाजिक जीवन जगू शकतो .

रोटरीचा मला आवडलेला कार्यक्रम म्हणजे 'डीस्ट्रीक्ट कॉन्फरन्स' मी पहिली कॉन्फरन्स शिर्डी येथील अटेंड केली .एन.जी.ओ मॅनेजमेंटच्या कोर्समध्ये भास्करराव पेरी पाटील यांच्या बद्दल शिकत असताना ,या कॉन्फरन्समध्ये मला त्यांना भेटण्याची संधी मिळाली . पुढील वर्षी ऑनलाईन कॉन्फरन्स झाली .त्यामध्ये ही मोठमोठे वक्ते ऐकायला मिळाले. शेगाव व नाशिक येथील कॉन्फरन्स मध्येही खूप छान वक्त्यांना ऐकायला मिळाले . या सर्व वक्त्यांना टीव्हीवर, युट्युब वर ऐकतो .त्यांना प्रत्यक्ष ऐकण्याची मजा काही वेगळीच असते. आपल्याला त्यांचे यश दिसते पण त्यांचा संघर्ष त्यांच्या व्याख्यानातून कळतो .संघर्षा शिवाय माणसाला आयुष्यात यश प्राप्त होत नाही .मोठ्या मोठ्या व्यक्तींना समजून घ्यायचे असेल, तर सर्वांनी कॉन्फरन्स अटेंड करावी .असे माझे प्रांजळ मत आहे.

गेले चार वर्षे मी अजिंठा बुलेटिनचे संपादक म्हणून कार्यरत आहे .काही अपरिहार्य कारणांमुळे बुलीटीनचे काम माझ्यावर सोपवण्यात आले .ते सोपवताना माजी अध्यक्षा रो.प्रा.डॉ.मंगला जंगले मॅडम यांनी मला छानसे स्वप्न दाखविले व यशाची हायट्रिक करून मी त्यांचे स्वप्न पूर्ण केले .या यशात माझा एकटीचाच वाटा नाही तर ,सर्व सदस्यांचे मला सहकार्य लाभले. करोना काळात खूप समस्या उद्भवल्या ,नंतरच्या काळातही वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जात मी एक व्यक्ती म्हणून समृद्ध होत गेली. आतापर्यंत अध्यात्मिक पुस्तकात जी जीवनमूल्ये मी वाचली होती.ती मला प्रत्यक्षात आचरणात आणता आले. दरवर्षी रोटरी क्लब मध्ये नवनवीन जीवनमूल्य शिकायला मिळत आहे आणि असेच पुढेही शिकायला मिळणार.......

## जीवेत् शरदः शतम्...!

| | |
|---|---|
| १)३ फेब्रुवारी | रो. स्नेहल फासे |
| २)४ फेब्रुवारी | रो. जयेश ठाकूर |
| ३)१० फेब्रुवारी | रो. अशोक भ. जैन |
| ४)२२ फेब्रुवारी | रो. निलेश झोपे |
| ५)२३ फेब्रुवारी | रो. विश्वजीत बऱ्हाटे |
| ६)२६ फेब्रुवारी | रो. शमा सराफ |

## नांदा सौख्यभरे...

| | |
|---|---|
| १) २ फेब्रुवारी | रो. मनोज जोशी |
| २) ३ फेब्रुवारी | रो. नंदकिशोर जाखेटीया |
| ३) ३ फेब्रुवारी | रो. अरविंद हासवानी |
| ४) ९ फेब्रुवारी | रो. डॉ. सागर जावळे |
| ५) ११ फेब्रुवारी | रो. रितेश जैन |
| ६) १६ फेब्रुवारी | पी.पी. रो. अशोक जोशी |
| ७) १८ फेब्रुवारी | रो. पराग जहांगिरदार |
| ८) १८ फेब्रुवारी | रो. सुशांत राका |
| ९) २२ फेब्रुवारी | रो. नितीन काळुंखे |
| १०) २७ फेब्रुवारी | पी.पी. रो. सुरेश केसवानी |




## अभिनंदन!

♠ रो. श्याम अग्रवाल यांचे सुपुत्र चि.हर्ष श्याम अग्रवाल हा सी.ए. फायनल एक्झाम मध्ये भारतात २९ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

♠ रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थ तर्फे आयोजित ४६ डेज रोटरी डी३०३० फिटनेस चॅलेंज स्पर्धेत रो.स्वाती ढाके यांनी ६७० कि.मी. अंतर चालून सुवर्णपदक प्राप्त केले.

♠ दि. ५, ६ व ७ जानेवारी २०२४ रोजी रो.दिपक व रो.दिपिका चांदोरकर यांनी बालगंधर्व संगीत महोत्सव अतिशय उत्कृष्टरित्या आयोजित केला.